# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र - ७६ दिनांक - ०५/०३/२०२४

## प्रेसनोट

## वर्क फ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन यु टुब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल/मुव्ही रेटींगमध्ये गुतंवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील रक्कम ७,९०,०००/- रुपये पैकी ७,००,०००/- रुपये तक्रारदार यांना परत करण्यात काशिमीरा पोलीस ठाण्यास यश.

!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस स्टेशन परीसरात राहणाऱ्या श्रीमती. जिगना मेहता, वय ४७ वर्षे वर्क फ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन यु टुब व्हीडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल/मुव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष दाखवुन फिर्यादी यांना ७,००,०००/- रुपयाची फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नंबर I ४८७/२०२३ भादंवीसं कलम ४२०,३४ सह माहिती तंजज्ञान अधिनीयमकलम ६६ (सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमूदत तक्रारी बाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्या करीता काशिमीरा पोलीस ठाणेचे अधिकारी/ अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने **तक्रारदार यांची फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम ७,००,०००/- रुपये त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.**

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- Telegram Channel, facebook,Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर अॅड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुक दारांचा विश्वास संपादन करण्यासाठी काही लोकांचे बॅक स्टेटमेंट मध्ये त्यांना फायदा झालेली रक्कम दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुक दारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुक दारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.

- **Work From Home नावाखाली Online You Tube Video Like Tasks, Hotel/Movie Rating या सारख्या गुंतवणुक करण्या-या बनावट जाहिरातींना बळी पडू नये.**
- **कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करुनये अथवा अनोळखी लिंक वर क्लिक करु नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्या सोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि ०१, मिरा रोड, श्री. विजय कुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवणे, पोउपनि.निखील चव्हाण, पो हवा/०६२०६ दिनेश आहेर यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्प लाईन क्रमांक - १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईहट - www.cybercrime.gov.in**

**----0000----**